हरित महाराष्ट्रासाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस >>पान 2

संजीवनी परिवाराचा वर्धापन दिन सोहळा थाटात संपन्न >>पान 3

बुलढाण्यात धक्कादायक घटना; ५ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार >>पान 4

दैनिक
# आपला विदर्भ

**सुविचार**

कर्तव्याची प्रीती ही ईश्वराची सर्वश्रेष्ठ भक्ती होय. - अज्ञात

apalavidarbhlivenews@gmail.com
मुख्य संपादक : देविदास खनपटे मो. 9767233034

■ बुलढाणा ■ वाशिम ■ यवतमाळ ■ अमरावती ■ वर्धा ■ नागपूर ■ गोंदिया ■ भंडारा ■ चंद्रपूर ■ गडचिरोली ■ छत्रपती संभाजीनगर ■ मुंबई

■ दैनिक ■ बुलडाणा ■ वर्ष 04 ■ अंक 174 ■ मंगळवार, दि. 03 फेब्रुवारी 2026 ■ पाने 4 ■ किंमत रू. 2 ■ RNI.NO.MAHMAR/2023/88006



कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'गोदावरी गौरव पुरस्कार' जाहीर; अभिनेते सयाजी शिंदेंसह 'यांचा' होणार सन्मान
आतील पान

# जिल्हा परिषद व पंचायत समितीच्या निवडणुकीसाठी ७ फेब्रुवारीस मतदान

## उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कर्मचाऱ्यांना भरपगारी सुट्टी

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी : राज्यातील १२ जिल्हा परिषदा व त्याअंतर्गत १२५ पंचायत समित्यांमध्ये शनिवार दि. ७ फेब्रुवारी २०२६ रोजी सार्वत्रिक निवडणूक होत आहे. या निवडणुकीमध्ये राज्यातील तसेच राज्याच्या सीमेलगतच्या सर्व मतदारांना आपला मतदानाचा हक्क बजावता यावा, यासाठी उद्योग, आस्थापना व कारखान्यांमधील कामगार कर्मचाऱ्यांना या दिवशी सुट्टी किंवा सवलत देणे बंधनकारक आहे, असे परिपत्रक उद्योग, उर्जा, कामगार व खनिकर्म विभागाने जारी केले आहे.**




यानुसार, निवडणूक होणाऱ्या मतदान क्षेत्रात मतदार असलेले कामगार, अधिकारी, कर्मचारी तसेच कामानिमित्त निवडणूक होणाऱ्या क्षेत्राबाहेर कार्यरत असलेल्या मतदारांनाही निवडणुकीच्या दिवशी मतदानाचा हक्क बजावण्यासाठी भरपगारी सुट्टी देण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्याचबरोबर, ही सुट्टी उद्योग, ऊर्जा व कामगार विभागांतर्गत येणाऱ्या सर्व आस्थापना, कारखाने, दुकाने इत्यादींना लागू असेल. यात खासगी कंपन्या यामधील आस्थापना, सर्व दुकाने व इतर आस्थापना, निवासी हॉटेल, खाद्यगृहे, अन्य गृहे, नाट्यगृहे, व्यापार, औद्योगिक उपक्रम किवा इतर आस्थापना तसेच माहिती तंत्रज्ञान कंपन्या, शॉपिंग सेंटर, माल्स, रिटेलर्स आदींना हे आदेश लागू राहणार आहेत. अपवादात्मक परिस्थितीत अनुपस्थितीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान होईल अशा धोकादायक अथवा लोकोपयोगी सेवेत अथवा आस्थापनांच्या संदर्भात अधिकारी, कर्मचारी व कामगार इत्यादींना पूर्ण दिवस सुट्टी देणे शक्य नसेल तर मतदानाचा हक्क बजावण्यासाठी सुट्टी ऐवजी दोन ते तीन तासांची विशेष सवलत मिळेल, याची दक्षता संबंधित आस्थापना मालकांनी घेणे आवश्यक राहील.



सार्वजनिक सुट्टी लागू असलेल्या जिल्हा परिषदेमध्ये रायगड (पंचायत समित्या - पनवेल, कर्जत, खालापूर, सुधागड, पेण, उरण, अलिबाग, मुरुड. रोहा, तळा, माणगाव, म्हसळा, श्रीवर्धन, महाड, पोलादपूर); रत्नागिरी (मंडणगड, दापोली, खेड, चिपळूण, गुहागर, रत्नागिरी, संगमेश्वर, लांजा, राजापूर); सिंधुदुर्ग (वैभववाडी, कणकवली, देवगड, मालवण, कुडाळ, वेंगुर्ला, सावंतवाडी दोडामार्ग); पुणे (जुन्नर, आंबेगाव, शिरुर, खेड, मावळ, मुळशी, हवेली, दौंड, पुरंदर, वेल्हे, भोर, बारामती, इंदापूर); सातारा (खंडाळा, फलटण, माण, खटाव, कोरेगाव, वाई, महाबळेश्वर, जावळी, सातारा, पाटण, कराड); सांगली (आटपाडी, जत, खानापूर (विटा), कडेगाव, तासगाव, कवठेमहांकाळ, पलूस, वाळवा-ईश्वरपूर, शिराळा, मिरज); सोलापूर (करमाळा, माढा, बार्शी, उत्तर सोलापूर, मोहोळ, पंढरपूर, माळशिरस, मंगळवेढा, सांगोला, दक्षिण सोलापूर, अक्कलकोट); कोल्हापूर (शाहुवाडी, पन्हाळा, हातकणंगले, शिरोळ, कागल, करवीर, गगनबावडा, राधानगरी, भुदरगड, आजरा, गडहिंग्लज, चंदगड); छत्रपती संभाजीनगर (सोयगाव, सिल्लोड, कन्नड, फुलंब्री, खुलताबाद, वैजापूर, गंगापूर, छत्रपती संभाजीनगर, पैठण); परभणी (जिंतूर, परभणी, मानवत, सेलू, पाथरी, सोनपेठ, पूर्णा, पालम, गंगाखेड); धाराशीव (परांडा, भूम, वाशी, कळंब, धाराशीव, तुळजापूर, लोहारा, उमरगा) आणि लातूर (पंचायत समित्या - अहमदपूर, जळकोट, उदगीर, चाकूर, रेणापूर, लातूर, शिरूर (अनंतपाळ), देवणी, औसा, निलंगा) यांचा समावेश आहे.

## मुलांमधील डिजिटल व्यसनाच्या अभ्यासासाठी तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करा - मंत्री ॲड.शेलार

**मुंबई/प्रतिनिधी :** मुलांमधील वाढत चाललेल्या डिजिटल व्यसनामुळे त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांच्या पार्श्वभूमीवर या विषयाचा सखोल अभ्यास करून त्यावर प्रभावी उपाययोजना सुचवण्यासाठी तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करण्याचे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले.

केंद्रीय अर्थ मंत्रालयाने २९ जानेवारी २०२६ रोजी प्रसिद्ध केलेल्या आर्थिक पाहणी अहवाल (इकॉनॉमिक सर्वे २०२५२६) मध्ये तरुण आणि अल्पवयीन मुलांमध्ये सोशल मीडिया व्यसनाचे वाढते धोके अधोरेखित करण्यात आले आहेत. या अहवालात मुलांसाठी सोशल मीडिया वापरावर वयोमर्यादा ठरविणे तसेच अल्पवयीनांना उद्देशून असलेल्या डिजिटल जाहिरातींवर निर्बंध आणण्याची शिफारस करण्यात आली आहे.

या अहवालाच्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्राच्या दृष्टीने या विषयाचे गांभीर्य लक्षात घेत माहिती तंत्रज्ञान विभागाचे प्रधान सचिव विरेंद्र



सिंह यांना तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करण्याबाबत लेखी निर्देश देण्यात आले आहेत.

माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. शेलार यांनी नमूद केले की, राज्यात १८ वर्षांखालील चार कोटी मुले असून त्यापैकी तीन कोटी मुले १५ वर्षांखालील आहेत. त्यांच्या मानसिक व शारीरिक आरोग्याचा प्रश्न महत्वपूर्ण आहे.

आपल्या पत्रात त्यांनी इंडियन सायकियाट्रिक सोसायटीच्या ७७व्या वार्षिक राष्ट्रीय परिषदेत सादर करण्यात आलेल्या निष्कर्षांचाही उल्लेख केला आहे. या परिषदेत तरुणांमध्ये मानसिक आरोग्याशी संबंधित समस्यांमध्ये चिंताजनक वाढ होत असल्याचे निर्दशनास आले असून, >> पान २

## परळी वैजनाथमध्ये १३ फेब्रुवारीपासून अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शन, राज्यातील पशुपक्षी पालकांना सहभागी होण्याचे आवाहन

**मुंबई/प्रतिनिधी :** बीड जिल्ह्यातील परळी वैजनाथ येथे १३ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत अखिल भारतीय पशुपक्षी प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे. या प्रदर्शनामध्ये देशभरातील विविध प्रजातींचे एक हजाराहून अधिक पशू सहभागी होणार असून प्रदर्शनाची जय्यत तयारी सुरू आहे. या पशुपक्षी प्रदर्शनात सहभागी व्हावे, असे आवाहन पशुसंवर्धन विभागामार्फत करण्यात आले आहे.या प्रदर्शनात पशुपालकांना गायी, म्हशी, घोडे, शेळ्या-मेंढ्या आणि विविध पक्ष्यांच्या दर्जेदार प्रजाती पाहायला मिळतील. केवळ महाराष्ट्रच नव्हे, तर संपूर्ण देशातील प्रगतशील पशुपालक व शेतकरी या ठिकाणी हजेरी लावणार आहेत. पशुपालकांना आधुनिक पशुपालन, आहार व्यवस्थापन आणि आरोग्याविषयी सविस्तर माहिती या माध्यमातून मिळणार आहे, अशी माहिती पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे यांनी दिली. राज्याच्या पशुसंवर्धन विभागाच्या वतीने पशुसंवर्धन विभागाचे सचिव (पदुम) डॉ. रामास्वामी एन. यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रदर्शनाचे नियोजन अत्यंत प्रभावीपणे करण्यात येत आहे.

## मालमत्तेचे व्यवहार करताना तोतयांपासून सावधगिरी बाळगावी-सह जिल्हा निबंधक कार्यालयाचे नागरिकांना आवाहन

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** तोतया व्यक्तींना पुढे करून बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्त नोंदणी करण्याचे प्रकार घडत असून, या पार्श्वभूमीवर जनसामान्यांनी मालमत्तेच्या खरेदी-विक्रीचे व्यवहार करतांना सावधगिरी बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक यांनी केले आहे.एका तोतया व्यक्तीने स्वतःला मूळ मालक म्हणून दर्शवत बनावट कागदपत्रांच्या आधारे दस्तनोंदणी केल्याचा गंभीर प्रकार अंधेरी येथील सह दुय्यम निबंधक यांच्या कार्यालयात २९ जानेवारी रोजी उघडकीस आला आहे. या प्रकरणी स्वतःला सलाउद्दीन आदम नाईक या मूळ मालकाच्या जागेवर भासवणारे मोहम्मद रफीक मोहम्मद इलियास यांच्याविरुद्ध जूहू पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सह जिल्हा निबंधक कार्यालयात मोठ्या प्रमाणावर खरेदी-विक्री, गहाणखत, बक्षीसपत्र, हक्कसोडपत्र, पॉवर ऑफ अॅटर्नी, करारनामे, विकसन करारनामे आदी सामान्य नागरिकांची कामे नियमित स्वरूपात मोठ्या प्रमाणात केली जातात. भविष्यात अशा प्रकारच्या फसवणुकीद्वारे मूळ मालकांची फसवणूक होऊ नये यासाठी नागरिकांनी कोणतेही व्यवहार करतांना जागरुकता बाळगण्याचे आवाहन मुंबई उपनगर जिल्ह्याचे सह जिल्हा निबंधक रमेश पगार यांनी केले आहे.

## कोणत्याही सरकारी कर्मचाऱ्याची इलेक्शन ड्युटी लावण्याचे आयोगाकडे विशेष अधिकार : राज्य निवडणूक आयोग

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी** राज्य निवडणूक आयोग ही घटनात्मक संस्था असून राज्यातील निवडणूक प्रक्रिया ही पारदर्शक आणि मुक्त वातावरणात घेण्याची जबाबदारी आयोगाची आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांना लोकप्रतिनिधी कायदा १९५१ लागू होत नाही. त्यामुळे आयोगानं आपल्या घटनात्मक अधिकारांचा वापर करून विविध सरकारी विभाग आणि प्राधिकरणांकडून कर्मचाऱ्यांची मागणी केली होती. यात न्यायालयीन कर्मचाऱ्यांचाही समावेश होता, असा दावा करत राज्य निवडणूक आयोगानं आपलं प्रतिज्ञापत्र सोमवारी मुंबई उच्च न्यायालयात दाखल केलंय. या याचिकेवर मुख्य न्यायमूर्ती श्री चंद्रशेखर आणि न्यायमूर्ती गौतम अंखड यांच्या खंडपीठासमोर दोन आठवड्यांनी सुनावणी होणार आहे.

या प्रकरणी राज्य निवडणूक आयोगाचे उपसचिव के. सुर्यकृष्णमूर्ती यांनी आपलं प्रतिज्ञापत्र कोर्टात सादर केलं. त्यात त्यांनी नमूद केलंय की, ''पालिका निवडणुकीत कर्मचाऱ्यांची उपलब्धता करण्यासाठी राज्य निवडणूक आयोगाकडं विशेष अधिकार आहेत. त्यात म्हटलंय की, सर्वोच्च न्यायालयानं किशनसिंग तोमर विरुद्ध अहमदाबाद महानगरपालिका खटल्यात दिलेल्या आदेशांनुसार, राज्य निवडणूक आयोगाचे अधिकार त्यांच्या कार्यक्षेत्रात केंद्रीय निवडणूक आयोगाच्या अधिकारांइतकेच व्यापक आहेत. मुक्त निवडणुकीसाठी आयोग आपल्या विशेष अधिकारांचा वापर करून आदेश देऊ शकतं,'' असा दावा यातून करण्यात आलाय.

मुंबई महापालिका निवडणुकीत जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम करणाऱ्या महापालिका आयुक्तांनी मुंबईतील सर्व कनिष्ठ न्यायालयातील कर्मचाऱ्यांना निवडणूक ड्युटीवर रुजू होण्याचे आदेश देत २२ डिसेंबर २०२५ रोजी पत्र पाठवलं होत. मुंबई उच्च न्यायालयानं यासंदर्भात गंभीर दखल घेत सुमोटो याचिका दाखल करून घेतली. त्यानंतर रातोरात या आदेशांना स्थगिती दिली होती. मुंबई उच्च न्यायालयानं पालिका आयुक्तांच्या अधिकारक्षेत्रावर बोट ठेवत जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या आयुक्तांना न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश कोणत्या अधिकारक्षेत्रात घेतले?, याबाबत जाब विचारत स्पष्टीकरण मागितलं होतं.

या प्रकरणाची गंभीर दखल घेत मुंबई उच्च न्यायालयानं सुमोटो याचिका दाखल करून घेतली. रात्री ८ वाजता मुख्य न्यायमूर्तींच्या मलबार हिल येथील शासकीय निवासस्थानी एक विशेष खंडपीठ स्थापन करून सुनावणी घेतली होती. या सुनावणीत पालिका आयुक्तांच्या अधिकारक्षेत्रावर न्यायालयानं थेट बोट ठेवत याबाबत स्पष्टीकरण मागितलं. त्यावर पालिका आयुक्तांनी काढलेलं हे पत्र मागे घेऊ देण्याची विनंती पालिकेच्या वकिलांनी कोर्टाकडं केली होती. परंतु मुंबई उच्च न्यायालयानं ही विनंती फेटाळून लावत जिल्हा निवडणूक अधिकारी म्हणून काम पाहणाऱ्या पालिका आयुक्तांना न्यायालयीन कर्मचाऱ्यांना निवडणूक कर्तव्यावर रुजू होण्याचे आदेश कोणत्या अधिकारक्षेत्रात घेतले?, याबाबत वैयक्तिक प्रतिज्ञापत्र दाखल करण्याचे आदेश जारी केले होते.

## अखेर भाजपचा गटनेता ठरला, गणेश खणकर यांची नियुक्ती

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महापालिकेत भाजपाच्या गटनेते पदी गणेश खणकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. खणकर हे प्रभाग ३ मधून निवडून आले आहेत. प्रहारने काही दिवसांपूर्वीच या संदर्भातले अचूक अंदाज वर्तवणारे वृत्त दिले होते आणि आता खणकर यांची गटेनेते पदी नियुक्ती पाहायला मिळत आहे.

गटनेते पदी गणेश खणकर यांची निवड

भाजप महापालिका गटनेते पदी गणेश खणकर यांची निवड झाली आहे. खणकर हे प्रभाग ३ मधून निवडून आले असून ते भाजपाचे प्रवक्ते आहेत. त्यांनी उबाठाचे सौरभ घोसाळकर यांचा पराभव केला आहे.

भाजपचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी नवनिर्वाचित गटनेते गणेश खणकर यांचे अभिनंदन केले आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाचे ८९ नगरसेवक निवडून आले आहेत. मुंबई महापालिकेतील भाजप हा मोठा पक्ष असल्याने या पक्षाच्या महापौर बनल्यास याच पक्षाचा गटनेता हा सभागृह नेता म्हणून निवडला जाऊ शकतो. त्यामुळे या सभागृह नेते पदासाठी माजी सभागृह नेते आणि भाजपचे ज्येष्ठ नगरसेवक प्रभाकर शिंदे यांचे नाव चर्चेत होते. मात्र, प्रभाकर शिंदे यांनी यापूर्वी सभागृह नेतेपद भूषवलेले असल्याने या पदावर पुन्हा त्यांची नेमणूक केली गेल्यास स्थायी समिती अध्यक्षपद कोणाला द्यावे यावरून पक्षाची मोठी अडचण झाली होती. ही बाब लक्षात घेऊन महापालिकेच्या सभागृह नेतेपदी भाजपचे प्रवक्ते आणि भाजपचे महामंत्री गणेश खणकर यांच्या नावाचा विचार केल्याची चर्चा आहे.

## शासकीय सेवाकाळात कामाचा ठसा उमटवणे महत्त्वाचे -मुख्य सचिव राजेश अग्रवाल

दैनिक आपला विदर्भ

**मुंबई/प्रतिनिधी :** शासकीय सेवेत आल्यानंतर विविध जबाबदाऱ्या पार पाडाव्या लागतात. परिस्थितीनुसार निर्णय घेण्याची क्षमता, कामाचा प्राधान्यक्रम आणि सकारात्मकता शासकीय सेवा काळात अत्यंत महत्त्वाची असते. हे गुण अंगी बाळगून आपल्या सेवाकाळात कामाचा ठसा उमटविणे महत्वाचे असते, असे मत मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी व्यक्त केले.

मंत्रालयातील परिषद सभागृहात गृह विभागाचे सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव इक्बाल सिंग चहल यांच्या सेवानिवृत्ती निमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी गृह विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव तथा मुंबई पोलीस हाउसिंग टाउनशिपचे अध्यक्ष इक्बाल सिंग चहल उपस्थित होते.

मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांनी यावेळी श्री. चहल यांच्या कार्याचा गौरव करीत त्यांच्यासोबतच्या विविध आठवणींना उजाळा दिला. तसेच मसुरी प्रशिक्षण केंद्रातील अनुभव, कोविड साथीच्या काळात मुंबई महापालिका आयुक्त म्हणून केंद्र सरकारच्या पातळीवर दिल्ली येथे झालेल्या त्यांच्या कार्याचा गौरव याचाही उल्लेख केला.

अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर म्हणाल्या, श्री. चहल यांनी ज्या विभागात काम केले त्या विभागात आपल्या कामातून विभागाची प्रतिमा उंचाविण्याचे कार्य केले. जलसंपदा विभागातील कामाचा विशेष उल्लेख करीत विभागांतर्गत सुरू असलेले सिंचनाचे प्रकल्प पूर्ण करण्यात श्री. चहल यांनी महत्त्वाची भूमिका बजावल्याचे सांगितले.



यावेळी महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे यांनीही अनुभव कथन केले. गृह विभागाचे प्रधान सचिव अनुप कुमार सिंग आणि राधिका रस्तोगी यांनीही आपल्या मनोगतात श्री. चहल यांच्या कामाची वैशिष्टे विषद केली. यावेळी सहसचिव सुग्रीव धपाटे, व्यंकटेश भट, उपसचिव अरविंद शेटे यांनीही सेवानिवृत्त अपर मुख्य सचिव चहल यांच्या कार्याचा गौरव केला.

सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन कक्ष अधिकारी मीनाक्षी कराळे यांनी केले. कार्यक्रमाला विविध विभागांचे अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव, गृह विभागाचे सहसचिव, उपसचिव, अवर सचिव, कक्ष अधिकारी व अन्य अधिकारी उपस्थित होते.

## अप्रकाशित पुस्तकाचा वाद...

सोमवारी लोकसभेत घडलेली घटना भारतीय संसदीय लोकशाहीच्या वर्तमान स्थितीचे स्पष्ट दर्शन घडवते. विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी राष्ट्रपतींच्या अभिभाषणावरील आभार प्रस्तावावर बोलताना द कारव्हान मासिकातील एका लेखाचा आधार घेऊन माजी लष्करप्रमुख जनरल मनोज मुकुंद नरवणे यांच्या अप्रकाशित आत्मचरित्र फोर स्टार्स ऑफ डेस्टिनी मधील उतारे वाचण्याचा प्रयत्न केला. या प्रयत्नाने सभागृहात जोरदार गोंधळ उडाला, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, गृहमंत्री अमित शाह, किरेन रिजिजू यांनी तीव्र आक्षेप घेतले आणि अध्यक्ष ओम बिर्ला यांनी नियम ३४९ चा हवाला देत चर्चा रोखली. परिणामी, सभागृह अनेकदा तहकूब झाले आणि मंगळवारपर्यंत स्थगित राहिले. या वादाचे मूळ जनरल नरवणे यांच्या अप्रकाशित पुस्तकातील उतारे उद्धृत केले आहेत. हे उतारे मुख्यतः २०२० च्या पूर्व लडाख सीमावादाशी (गलवान- रेचिन ला घटना) संबंधित आहेत. नरवणे यांच्या मते, ३१ ऑगस्ट २०२० रोजी चिनी टॅक्स आणि सैन्याने रेचिन ला दिशेने हालचाल केली, ज्यामुळे भारतीय सैन्याच्या काही पदांपर्यंत धोका निर्माण झाला. त्यांनी लिहिले आहे की, प्रत्येकाला माझा प्रश्न होता, मी आदेश काय द्यावा? राजनाथ सिंह यांनी त्यांना जो उचित समजेल ते करा असे सांगितले, ज्याचा अर्थ कार्ट ब्लॅच (पूर्ण स्वातंत्र्य) देण्यात आला. हे उतारे सरकारच्या चीन धोरणावर, विशेषतः २०२० च्या संकट हाताळणीवर प्रश्न उपस्थित करतात की राजकीय नेतृत्वाने जबाबदारी लष्करावर टाकली आणि नंतर स्पिन करून यश दाखवले. राहुल गांधी यांनी हे उतारे वाचण्याचा प्रयत्न केला, कारण भाजप खासदार तेजस्वी सूर्य यांनी काँग्रेसला देशभक्त नसल्याचा आरोप केला होता. राहुल यांनी म्हटले, सरकार दहशतवादाविरुद्ध लढत असल्याचा दावा करत असताना एका मजकुराची भीती का? ते डोकलामचा उल्लेख करत असले तरी, लेखात मुख्यतः २०२० लडाखचा संदर्भ आहे, ज्यात चिनी टॅक्स भारतीय तळाजवळ पोहोचल्या होत्या. हा मुद्दा सरकारच्या परराष्ट्र धोरण, सीमावाद हाताळणी आणि लष्कराच्या स्वायत्ततेवर प्रकाश टाकतो. सत्ताधारी पक्षाने याला नियमांचा मुद्दा बनवले. राजनाथ सिंह यांनी सांगितले की, अप्रकाशित पुस्तकाचा उल्लेख दिशाभूल करणारा आहे. अमित शाह यांनी म्हटले की, मासिक काहीही लिहू शकते. अध्यक्ष बिर्ला यांनी नियम ३४९(१) चा हवाला देत सांगितले की, सभागृहात पुस्तक, वर्तमानपत्र किंवा असंबंधित मजकूर वाचता येत नाही. निशिकांत दुबे यांनी सॅटॅनिक वर्सेस चा दाखला देत काँग्रेसच्या काळातील प्रथा सांगितली. राज्यघटना कलम १९(२) च्या आधारावर राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाने मर्यादा असल्याचेही सांगितले गेले. विरोधकांनी मात्र हे सार्वजनिक हिताचे म्हणून पाठिंबा दिला. प्रियांका गांधी, अभिषेक मनु सिंघवी, अरविंद सावंत यांनी सांगितले की, माजी लष्करप्रमुखांच्या मतांना दाबणे चुकीचे आहे. पुस्तक प्रकाशित होऊ दिले नाही, म्हणजे सरकार लपवण्याचा प्रयत्न करत आहे. पूर्व लोकसभा सेक्रेटरी जनरल पी.डी.टी. आचार्य यांच्या मते, अप्रकाशित मजकुराचा उल्लेख करता येतो, पण सत्यतेची हमी द्यावी लागते; अन्यथा ब्रिच ऑफ प्रिव्हिलेज होऊ शकते. ही घटना दोन गोष्टी स्पष्ट करतेः एक, संसदेत अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि नियम यांच्यातील ताण. नियम ३४९ सारखे प्रावधानावर चर्चा नियंत्रित करण्यासाठी आहेत, पण त्यांचा दुरुपयोग मुद्दे टाळण्यासाठी होतो. दुसरे, राष्ट्रीय सुरक्षेच्या नावाखाली अस्वस्थ करणाऱ्या सत्यांना दाबण्याची प्रवृत्ती. जनरल नरवणे हे सामान्य व्यक्ती नव्हते; त्यांचे अनुभव राष्ट्रीय हिताचे आहेत. पुस्तक अप्रकाशित राहिले तरी, माध्यमातून उतारे सार्वजनिक झाले आहेत. सरकारने ते प्रकाशित होऊ दिले असते तर हे वाद टाळता आले असते. या घटनेतून स्पष्ट होते की, संसद उत्पादक चर्चेसाठी नव्हे तर राजकीय नाटकासाठी वापरली जात आहे. राहुल गांधींचा हा प्रयत्न राजकीय स्टंट असू शकतो, पण तो सरकारच्या कमकुवत धोरणांवर प्रकाश टाकतो. चीन सीमेवर २०२० पासून काय घडले, हे पूर्ण सत्य जनतेसमोर येणे गरजेचे आहे. लष्करप्रमुखांच्या मतांना दाबणे हे लष्कराच्या नैतिकतेवर आणि लोकशाहीच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह उभे करते. शेवटी, लोकशाही मजबूत होण्यासाठी संसदेत नियमांचा आदर आणि मुद्यांवर मुक्त चर्चा दोन्ही आवश्यक आहेत. अप्रकाशित पुस्तकाचा वाद संपवण्याऐवजी, सरकारने सीमावाद, लष्कराची तयारी आणि धोरणांवर खुली चर्चा घ्यावी. अन्यथा, असे गोंधळ वाढत राहतील आणि जनतेचा संसदेवर विश्वास कमी होईल. सत्य लपवण्यापेक्षा उघड करणे हेच खरे देशभक्तीचे लक्षण आहे. सरकारने यावर चर्चा न टाळता आपले मुद्दे ठेवावेत आणि संसद बंद पडण्यात जाणारा वेळ वाचवावा. अशा काळात आठवण येते अरुण जेटली यांची. ते भारतीय राजकारणातील एक प्रभावी वक्ते आणि रणनीतिकार होते. ते २००९ ते २०१४ पर्यंत राज्यसभेत विरोधी पक्षनेते म्हणून कार्यरत होते. या काळात संसदेत अनेकदा गोंधळ आणि तहकूबी होत असताना, जेटलींनी विरोधी पक्ष म्हणून गोंधळाला कायदेशीर रणनीती म्हणून समर्थन केले होते. त्यांच्या मते, जर सरकार संसदीय जबाबदारी टाळत असेल आणि चर्चा दाबण्याचा प्रयत्न करत असेल, तर विरोधकांना संसद रोखणे हा शेवटचा पर्याय असतो. २०१०-२०११ च्या २जी घोटाळा प्रकरणातः जेटलींनी भाजपच्या नेतृत्वाखाली संसदेत सातत्याने गोंधळ घालून सरकारला संयुक्त संसदीय समितीची मागणी मान्य करण्यास भाग पाडले. सरकारला २जी स्पेक्ट्रम वाटपाची चौकशी मान्य करावी लागली. जेटलींनी नंतर सांगितले की, अशा रणनीतीमुळे ३जी लिलावातून प्रचंड महसूल मिळाला. २०११ मध्ये अण्णा हजारे चळवळ आणि जन लोकपाल विधेयकावर जेटलींनी संसदेत चर्चा घडवून आणण्यासाठी विरोधी पक्षाची भूमिका मजबूत केली. त्यांनी सरकारच्या विरोधात संसद रोखण्याला समर्थन दिले, कारण सरकार लोकपाल विधेयकावर चर्चा टाळत होते. यामुळे जन लोकपाल विधेयकावर मोठी चर्चा झाली. तेच महागाई आणि इतर मुद्यांवर केले. महागाईसारख्या जनहिताच्या मुद्द्यावर संसद रोखणे हे जनतेच्या हितासाठी आहे.

# हरित महाराष्ट्रासाठी ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन राबवा- मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

- हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापनेसाठी प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश
- वृक्ष लागवड मोहिमेत स्टार्टअपचा सहभाग घ्यावा
- रोप निर्मितीसाठी खासगी नर्सरी व बचतगटांचा सहभाग घ्यावा

दैनिक आपला विदर्भ




**मुंबई/प्रतिनिधी :** पर्यावरण संवर्धन, हवामान बदलाशी लढा आणि ग्रामीण रोजगार निर्मिती या त्रिसूत्रीवर महाराष्ट्रातील हरित क्षेत्र वाढविण्यासाठी २०२६ ते २०३१ या कालावधीत ३०० कोटी वृक्ष लागवडीचा कार्यक्रम हाती घ्यावा. वृक्ष लागवडीच्या कार्यक्रमात या क्षेत्रातील तज्ज्ञ, स्वयंसेवी संस्था याच्याबरोबरच स्टार्टअपचा सहभाग घ्यावा, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

प्रस्तावित हरित प्राधिकरण - ३०० कोटी वृक्ष लागवड मिशन संदर्भात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वर्षा निवास्थानी आढावा बैठक झाली. त्यावेळी मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले की, राज्यातील वनक्षेत्र ३३ टक्के करण्यासाठी मिशन मोडवर हा कार्यक्रम हाती घ्यावा. या कार्यक्रमाच्या समन्वयासाठी हरित महाराष्ट्र प्राधिकरण स्थापन करण्यासाठीचा प्रस्ताव मंत्रिमंडळ बैठकीत सादर करावा. शासकीय विभाग, विविध संस्थाबरोबरच या विषयातील स्टार्टअपचा सहभाग या मोहिमेसाठी घ्यावा.स्टार्टअपची इकोसिस्टीम तयार करून रोजगार निर्मिती करता येईल.

मराठवाड्यासारख्या कमी वृक्षाच्छादन असलेल्या भागात हा कार्यक्रम प्राधान्याने राबविण्यात यावा. हरित महाराष्ट्र उपक्रमांतर्गत रोप उपलब्धतेनुसार पहिल्या वर्षात सुमारे २० कोटीपर्यंत वृक्ष लागवड हाती घ्यावी. यामध्ये बांबू, साग लागवड करण्यात यावी. यासाठी लागणारी रोपे तयार करण्यासाठी शासकीय नर्सरी बरोबरच खासगी नर्सरी, बचतगट यांचाही सहभाग घ्यावा. या कार्यक्रमातील सर्व शासकीय विभागाबरोबरच वन विभाग, नर्सरी यांना उद्दिष्टे ठरवून द्यावीत, ग्रामीण भागात शेतकरी, युवा, महिलांचा सहभाग घ्यावा. असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले.

यावेळी 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी यांनी या उपक्रमांचे सादरीकरण केले. या मिशन अंतर्गत राज्यातील विविध कृषी-हवामान पट्ट्यांनुसार स्थानिक परिसंस्थेला अनुरूप प्रजातींचीच लागवड करण्यात येणार असून, गवताळ प्रदेश व दलदलींमध्ये वृक्ष लागवड न करता त्यांचे पुनर्संचयितीकरण केले जाणार आहे. या मिशनची अंमलबजावणी डिजिटल व उपग्रह-आधारित रिअल-टाईम निरीक्षण प्रणालीद्वारे होणार असून, लागवड आणि वृक्ष जगण्याचा दर पारदर्शकपणे नोंदवला जाणार आहे. झाडे जिवंत असण्याचा दर, जंगलाची निर्मिती आणि रोपांच्या वाढीची नियमित तपासणी करण्यात येणार आहे.

मनरेगा, कॅम्पा, कृषी विभाग व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या योजनांद्वारे तीन ते पाच वर्षांची निगा सुनिश्चित करण्यात आली आहे. तथापी वृक्ष जगण्यासाठी हा कालावधी १० वर्ष करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या उपक्रमातून भूजल पुनर्भरण, मातीची सुपीकता, जैवविविधता वाढीसोबतच ग्रामीण भागात मोठ्या प्रमाणावर रोजगारनिर्मिती होणार आहे, असे यावेळी सांगण्यात आले.

यावेळी मुख्य सचिव राजेश अग्रवाल, मुख्यमंत्र्यांचे वरिष्ठ आर्थिक सल्लागार तथा मित्रा संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रविण परदेशी, जलसंपदा विभागाचे अपर मुख्य सचिव दीपक कपूर, वन विभागाचे अपर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव विकास खारगे, नगरविकास (२) विभागाचे अपर मुख्य सचिव के. एच गोविंदराज, कृषी विभागाचे अपर मुख्य सचिव विकास चंद्र रस्तोगी, मृद व जलसंधारण सचिव गणेश पाटील, प्रधान मुख्य वन संरक्षक (वन बल प्रमुख) श्रीनिवास राव, प्रधान मुख्य वन संरक्षक (सामाजिक वनीकरण) विवेक खांडेकर, महाराष्ट्र रिमोट सेन्सिग अप्लिकेशन सेंटरचे (एमआरएसएसी) चे संचालक श्री. कोलते आदी उपस्थित होते.

पान १ वरून...

## मुलांमधील डिजिटल व्यसनाच्या अभ्यासासाठी तज्ज्ञांचा टास्क फोर्स नियुक्त करा - मंत्री ॲड.शेलार

५० टक्क्यांहून अधिक मानसिक आजारांची सुरुवात १८ वर्षांपूर्वी होत असल्याचे तसेच ३५ वर्षांखालील वयोगटात या समस्यांचे प्रमाण लक्षणीयरीत्या वाढल्याचे स्पष्ट झाले आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक उपाययोजनांची तातडीची गरज असल्याचेही त्यांनी सांगितले.

आर्थिक पाहणी अहवालातील शिफारसी आणि तज्ज्ञांनी मांडलेल्या अभ्यासाच्य आधारे राज्यासाठी संतुलित व माहितीपूर्ण धोरण ठरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञान विभागाने या विषयाचा सखोल अभ्यास करावा, असे निर्देश माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.शेलार यांनी दिले आहे. आवश्यक असल्यास सर्वांगीण अभ्यासासाठी तज्ज्ञांचा कार्यदल स्थापन करण्याचेही त्यांनी निर्देश दिले आहे.

या कार्यदलामध्ये शिक्षणतज्ज्ञ, मानसोपचारतज्ज्ञ, बालसमुपदेशक, तंत्रज्ञान तज्ज्ञ, व्यवस्थापन तज्ज्ञ, डॉक्टर, कायदेतज्ज्ञ तसेच संबंधित शासकीय विभागांचे अधिकारी यांचा समावेश असणार आहे.

प्रस्तावित कार्यदलाच्या कार्यक्षेत्रात मुलांचे संरक्षण व सुरक्षितता, मानसिक आरोग्यावर होणारा परिणाम, डिजिटल प्लॅटफॉर्मचा संतुलित व जबाबदार वापर, शिक्षण व एकूण विकासावर होणारा परिणाम, सांस्कृतिक व कौटुंबिक घटक, लिंगनिहाय फरक, ग्रामीण व शहरी परिस्थितीतील भेद, सर्व उत्पन्न गटांचा समावेश, उत्पादकता व व्यापक आर्थिक परिणाम तसेच मुलांच्या डिजिटल सुरक्षिततेसाठी अस्तित्वात असलेल्या राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय चौकटींचा आढावा यांचा समावेश करण्याचे निर्देशही माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड. शेलार यांनी दिले आहेत.

डिजिटल युगात मुलांच्या सर्वांगीण कल्याणासाठी शासनाने पुढाकार घेऊन योग्य व परिणामकारक उपाययोजना करणे आवश्यक असून, या आव्हानाला सामोरे जाताना माहितीपूर्ण आणि संतुलित दृष्टिकोन स्वीकारण्याची हीच योग्य वेळ असल्याचे मत माहिती तंत्रज्ञान मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी व्यक्त केले आहे.

## कुसुमाग्रज प्रतिष्ठानचा 'गोदावरी गौरव पुरस्कार' जाहीर; अभिनेते सयाजी शिंदेंसह 'यांचा' होणार सन्मान

नाशिक : मराठी साहित्य, कला, विज्ञान आणि समाजसेवेच्या क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा सन्मान करण्याची परंपरा जपणाऱ्या नाशिक येथील कुसुमाग्रज प्रतिष्ठानतर्फे दिला जाणारा प्रतिष्ठेचा 'गोदावरी गौरव पुरस्कार' यंदाही जाहीर करण्यात आला आहे. कुसुमाग्रजांच्या स्मृतिदिनानिमित्त मंगळवारी (१० मार्च २०२६) नाशिक येथे हा सन्मान सोहळा भव्य स्वरुपात आयोजित करण्यात येणार आहे. यंदाच्या पुरस्कारासाठी विज्ञान, साहस, चित्रकला, लोकसेवा, नाट्य आणि संगीत या विविध क्षेत्रातील सहा मान्यवरांची निवड करण्यात आली आहे. डॉ. अनिरुद्ध पंडित (विज्ञान), आशिष माने (साहस), चंद्रमोहन कुलकर्णी (चित्रकला), अभिनेते सयाजी शिंदे (लोकसेवा), अभिनेते प्रशांत दामले (नाट्य) आणि उस्ताद उस्मान खान (संगीत) यांना यंदाचा 'गोदावरी गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात येणार आहे.

''साहित्यिक, सामाजिक आणि सांस्कृतिक जाणिवा जपणाऱ्या कुसुमाग्रजांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्यासाठी हा पुरस्कार दिला जातो. समाजासाठी निष्ठेने, प्रामाणिकपणे आणि सातत्याने काम करणाऱ्या व्यक्तिमत्त्वांचा गौरव करणे, हेच या पुरस्कारामागचे मुख्य उद्दिष्ट आहे. दर दोन वर्षांनी दिला जाणारा हा पुरस्कार आज केवळ नाशिकपुरता मर्यादित न राहता महाराष्ट्राच्या सांस्कृतिक विश्वातील एक मानाचा सन्मान म्हणून ओळखला जातो,'' अशी माहिती कुसुमाग्रज प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष कवी प्रकाश होळकर यांनी पत्रकार परिषदेत दिली.

# नैसर्गिक तेल व वायूची बचत ही देशसेवा -मंत्री मंगलप्रभात लोढा

## ऊर्जा संवर्धनासाठी 'सक्षम २०२५-२६' अभियानाची आजपासून सुरुवात

दैनिक आपला विदर्भ







**मुंबई/प्रतिनिधी :** नैसर्गिक तेल व वायूची बचत करणे ही देशाची सेवा आहे. विकसित भारत २०४७ च्या उद्दीष्टामधील प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचे इंधन बचत हे ध्येय असून प्रत्येकाच्या सहभागाने देश हे ध्येय साध्य करेल. तेल व वायूचे संवर्धन करणे म्हणजे हरित ऊर्जेचा अंगीकार करणे हा आपल्या प्रत्येकाच्या सामाजिक उत्तरदायित्वाच्या या उपक्रमात सहभागी व्हावे, असे आवाहन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

प्रभादेवी रवींद्र नाट्य मंदिर येथे केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि राज्य शासनाच्या सहकार्याने तेल उद्योगातील राज्यस्तरीय समन्वयकांकडून विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत. त्याअंतर्गत संरक्षण क्षमता महोत्सव २०२५-२६ चा मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या अध्यक्षतेखाली या कार्यक्रमाचा शुभारंभ करण्यात आला त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी महाराष्ट्र राज्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचे राज्यस्तरीय समन्वयक उमेश कुलकर्णी, महाराष्ट्र बीपीसीएलचे प्रमुख रिटेल (पश्चिम)चे थॉमस जेम्स, एमएच-१ आणि गोवा, बीपीसीएलचे राज्य प्रमुख (रिटेल) चे मिहिर जोशी, एचपीसीएलचे उपमहाव्यवस्थापक बरुण कुमार, आयओसीएलचे महाव्यवस्थापक देवांशू मिश्रा, गेल इंडिया लिमिटेडचे महाव्यवस्थापक (विपणन) जितेंद्र गुप्ता, राज्य समन्वयक विभाग मुख्य प्रबंधक दीपक वाघ, राज्य समन्वयक विभाग वरिष्ठ प्रबंधक रितेश जाधव, शालेय विद्यार्थी तसेच राज्यातील विविध इंधन वितरक उपस्थित होते.

मंत्री लोढा म्हणाले की, राज्य तेल व समन्वय विभागाच्या वतीने राबविण्यात येणाऱ्या संरक्षण समता महोत्सव अभियानाचा उद्देश जीवाश्म इंधनांचा अपव्यय कमी करणे, परकीय चलनावरील वाढता भार रोखणे तसेच हरितगृह वायूंमुळे होणारे पर्यावरणीय नुकसान कमी करणे हा आहे. आज जगभरात ऊर्जेला सर्वाधिक मागणी आहे. जागतिक स्तरावरील राजकारण तेलाभोवती एकवटले आहे. इंधनाची बचत करणे म्हणजे देशाच्या प्रगतीला हातभार लावणे असे आहे. सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा जास्तीत जास्त वापर करून आपण तेल बचत करू शकतो. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वात राज्यात हरित उर्जेला प्राधान्य देण्यात येत आहे. शालेय जीवनामध्ये तेल संवर्धनाचे महत्त्व पटवून दिल्यास भविष्यात त्याचा चांगला उपयोग होऊ शकतो. प्रत्येक घटकाचा तेल बचतीमधील खारीचा वाटा हा देशाच्या प्रगतीला हातभार लागू शकतो असे मत मंत्री लोढा यांनी व्यक्त केले.

राज्याचे पेट्रोलियम आणि नैसर्गिक वायूचे राज्यस्तरीय समन्वयक उमेश कुलकर्णी म्हणाले की, भारत सरकारच्या ऊर्जा सुरक्षितता, शाश्वत विकास आणि पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या 'सक्षम २०२५-२६ (संरक्षण क्षमता महोत्सव)' या राष्ट्रीय अभियानाची आजपासून देशभरात सुरुवात होत आहे. १ ते १५ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत '' , (तेल आणि गॅस वाचवा, हरित ऊर्जा स्वीकारा)'' या घोषवाक्यासह हे अभियान संपूर्ण देशभर राबविण्यात येत आहे. केंद्रीय पेट्रोलियम व नैसर्गिक वायू मंत्रालयाच्या मार्गदर्शनाखाली आणि संबंधित राज्य शासनाच्या सहकार्याने तेल उद्योगातील राज्यस्तरीय समन्वयकांकडून विविध जनजागृती उपक्रम आयोजित करण्यात येत आहेत.

सक्षम अभियानाच्या पंधरवड्यात शाळा व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी गटचर्चा व वादविवाद, महाविद्यालयांमध्ये भित्तीचित्र व ग्राफिटी स्पर्धा, इंधन-कार्यक्षम वाहनचालक स्पर्धा, लेखन स्पर्धा, दूरदर्शन व रेडिओवरील चर्चासत्रांचे आयोजन. या अभियाना दरम्यान शालेय विद्यार्थी, युवक, एलपीजी वापरकर्ते, वाहनचालक, उद्योग क्षेत्रातील कर्मचारी, शेतकरी, गृहनिर्माण संस्था, ग्रामपंचायती व स्वयंसेवी संस्था यांच्यापर्यंत पोहोचून इंधन संवर्धनाचे महत्त्व, फायदे आणि उपाय योजनांबाबत व्यापक जनजागृती करण्यात येणार आहे. इंधन-कार्यक्षम तंत्रज्ञान आणि शाश्वत पद्धतींचा अवलंब करण्यास प्रोत्साहन दिले जाणार आहे अशी माहिती यावेळी त्यांनी दिली. राज्य समन्वयक विभाग मुख्य प्रबंधक दीपक वाघ यांनी इंधन बचतीची शपथ दिली. यावेळी मायरा फाउंडेशनतर्फे इंधन बचतीचे पथनाट्य सादर करण्यात आले.

DAINIK AAPLA VIDHARBH-Printed by Rameshwar Vishwanath Sakalkar & Published by DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Printed at Shubham printing press near tahsil office Mehkar-443301 (M.S.) and Published at mehkar- malegaon road near polics Station Dongaon Dist. Buldana-443301 (Mah.) Editor DEVIDAS MADHAVRAO KHANPATE Mob.No.97672 33034 Title-Code:- MAHMAR52707

हे पत्र प्रकाशक, मालक देविदास माधवराव खनपटे यांनी शुभम प्रिंटिंग प्रेस तहसील कार्यालयाजवळ मेहकर जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथे छापून मेहकर मालेगाव रोड पोलीस स्टेशन समोर डोणगाव, जि. बुलडाणा-४४३३०१ (महा) येथून प्रकाशित केले. मुद्रक रामेश्वर विश्वनाथ साकळकर, संपादक-देविदास माधवराव खनपटे मोबा.९७६७२ ३३०३४ पीआरबी कायद्यानुसार छापलेल्या मताशी सहमत असेलच असे नाही, वादविवाद फक्त मेहकर न्यायालया अंतर्गत, (टिप: प्रकाशित

# संजीवनी परिवाराचा वर्धापन दिन सोहळा थाटात संपन्न

## जिद्द, चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर यशवंत व्हा : तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर

### राजमाता माँ जिजाऊ पुरस्काराच्या तहसीलदार तेजनकर ठरल्या मानकरी..

**दैनिक आपला विदर्भ**

**डोणगांव/प्रतिनिधी** : संजीवनी सेवाभावी परिवाराच्या २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात जिद्द चिकाटी आणि मेहनतीच्या बळावर यशवंत व्हा असे मत रिसोड जि वाशिम तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर यांनी व्यक्त केले.यावेळी त्याना राजमाता मा जिजाऊ तर पत्रकार बांधवांना संजीवनी दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दि १ फेब्रुवारी रोजी राजुरकर मंगल कार्यालय मध्ये आयोजित वर्धापन दिन सोहळ्याच्या अध्यक्षस्थानी ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रमोदबाप्पु देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून माजी सरपंच मधुकरराव घिरके,अकबरखापठाण,अनिलआप्पा आवटी,सहा पोलीस निरीक्षक संतोष अघाव, भारत मोरे, सौ वंदनाताई आखाडे, ठाणेदार अमरनाथ नागरे पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष गजानन चनेवार, दत्ता उमाळे, सिध्देश्वर पवार, कैलास राऊत आदी मान्यवर उपस्थित होते. सर्व प्रथम दिपप्रज्वलन करून राजमाता मा जिजाऊ, स्वामी विवेकानंद, आद्य पत्रकार बाळशास्त्री जांभेकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून उपमुख्यमंत्री स्व अजीतदादा पवार यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली.

आयोजकांच्या वतिने मान्यवंराचे शाल श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन स्वागत करण्यात आले. प्रास्ताविक मनोगतातून डॉ गजानन उल्हामाले व राजेंद्र पळसकर यांनी राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक, शैक्षणिक व सांस्कृतिक कार्याची माहिती देवून पुरस्कार प्राप्त सर्वाचे स्वागत करुन आभार व्यक्त केले.









यावेळी स्व चतुराबाई सदाशिवराव पळसकर स्मृति प्रित्यर्थ राजमाता मा जिजाऊ पुरस्काराने तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, संजीवनी सेवा रत्नाने सहा पोलीस निरीक्षक भारत मोरे, स्व रमेश माधव सावजी स्मृती कृषी भूषण पुरस्काराने आदर्श शेतकरी प्रविण गजानन सुर्वे, विनोद गणपतराव बाजड, स्व डॉ जगदीश बिडवई स्मृती प्रित्यर्थ पत्रकार अशोक वानखेडे, गजानन देशमुख, रविंद्र वाघ सादीक कुरेशी, नवल राठोड सह विविध क्षेत्रातील माजी सरपंच सौ रेखा पांडव, सौ वैशाली आंबेकर, अमोल पळसकर, गणेश कोकाटे, संतोष पवार, सोफीयान शाह, नागेश जाधव,करीमभाई ड्रायव्हर, शैलेश चव्हाण सह गुणवंत विद्यार्थ्यांना गौरविण्यात आले आहे.

याप्रसंगी सोमेश जयस्वाल, कु डॉ प्रणया आंबेकर, सिध्देश्वर पवार, प्रमोद देशमुख,सह सत्कार मुर्ती मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त केले. सत्कारमूर्ती प्रतिक्षा तेजनकर व भारत मोरे यांनी आपल्या संघर्षमय जीवनातून यशश्री खेचून आणण्यासाठी केलेली पराकाष्ठा यावेळी विषद करून पुरस्काराच्या माध्यमातून दिलेल्या शाबासकीचे आभार मानले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार सुरेन्द्र सिंह चव्हाण यांनी मानले, यशस्वीतेसाठी जयंत बिडवई, सुरेश आप्पा फिसके, विनोद खंडारे, बबनराव पळसकर, आसीफ खान, डॉ शिवाजीराव बाजड, गजानन खिल्लारी, हितेश सावजी, योगेश सारडा, किरण देवकर, डॉ नकुल फुले, डॉ ओम काळे, गणेश वाघमारे, गणेश पळसकर असलम खान,कु आराध्या धुमाळ आदिनी अथक परिश्रम घेतले.

## जेजुरी गडावर शिखर काठी भेट उत्सव उत्साहात साजरा



**जेजुरी/प्रतिनिधी** : जेजुरीचा खंडोबा हे संपूर्ण महाराष्ट्राचे कुलदैवत आहे. या लोकदैवताच्या वर्षभरात अनेक यात्रा भरतात. प्रत्येक यात्रेला वेगळी प्रथा आणि वेगळं महत्त्व आहे. माघ पौर्णिमेच्या दुसऱ्या दिवशी खंडोबा मंदिराच्या शिखराला काठी टेकवण्याचा मानाचा कार्यक्रम पार पडतो.

या सोहळ्यात संगमनेरचे होलम, बारामती तालुक्यातील सुपे येथील खैरे आणि होळकर यांच्या ऐतिहासिक काळापासूनच्या मानाच्या शिखर काठ्या तसेच इतर पन्नासहून अधिक गावोगावच्या शिखर काठ्या जेजुरी गडावर येऊन देवभेट घेतात.

खंडोबा मंदिराच्या शिखराला मानाच्या काठ्या टेकवण्यात आल्या आणि हा सोहळा पाहणाऱ्यांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारा ठरला. मानाच्या काठ्यांबरोबरच अनेक प्रासादिक काठ्यांनी शिखर काठी यात्रेचा मान घेतला. यावेळी मंदिर परिसरात उपस्थित भाविकांनी एकच जल्लोष केला. वाद्यांच्या गजरात, भंडाऱ्यांची उधळण करत भाविकांनी जल्लोषात ठेका धरला होता.

## आयसीसीचं घोडं अडलं! इंडिया- पाक मॅचवर संकट, तब्बल २०० कोटींच्या कमाईवर पाणी

**मुंबई/प्रतिनिधी :** टी-२० वर्ल्ड कप २०२६ आधीच भारत-पाकिस्तान सामन्यावरून परिस्थिती अधिकच चिघळताना दिसत आहे. पाकिस्तान क्रिकेट बोर्डाने स्पष्ट शब्दांत जाहीर केलं आहे की, त्यांचा संघ भारताविरुद्ध सामना खेळणार नाही. यामागे पाकिस्तान सरकारचा आदेश कारणीभूत असल्याचं पीसीबीकडून सांगण्यात आलं आहे. या निर्णयामुळे केवळ क्रिकेट चाहत्यांच्या अपेक्षांवर पाणी फेरलं गेलं असं नाही, तर आयसीसीच्या कमाईवरही मोठं प्रश्नचिन्ह उभं राहिलं आहे. आयसीसीच्या कोणत्याही स्पर्धेत भारत-पाकिस्तान सामना सर्वाधिक चर्चेत असतो. हा सामना फक्त क्रिकेटपुरता मर्यादित नसून, भावना, प्रतिष्ठा आणि हाय-व्होल्टेज ड्रामाचा संपूर्ण पॅकेज असतो. त्यामुळेच टीव्ही आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर या सामन्याची प्रेक्षकसंख्या विक्रमी असते.

ब्रॉडकास्टर्स मोठ्या रक्कमेचे मीडिया राइट्स मुख्यत: याच सामन्याच्या जोरावर खरेदी करतात. सामान्यत: भारताच्या एका सामन्यातून सुमारे १०० कोटी रुपयांपर्यंत कमाई होते, मात्र पाकिस्तानविरुद्धच्या सामन्यात हा आकडा त्याहीपेक्षा कितीतरी जास्त वाढतो.

भारत-पाकिस्तान टी-२० सामन्यादरम्यान जाहिरातींचे दर गगनाला भिडलेले असतात.

## पहूर येथील बचत गटातील महिलेच्या कुटुंबाला पीएमएसबीवाय अंतर्गत

# दोन लाखांचा विमा क्लेम मंजूर

**दैनिक आपला विदर्भ**

**■ अशोक मुंढे**

**महारचिकना:** लोणार तालुक्यातील पहूर येथील बचत गटातील महिला सिंधुबाई शंकर मुंढे यांचा सर्पदंशामुळे दुर्दैवी मृत्यू झाला होता. महाराष्ट्र ग्रामीण जीवनोन्नती अभियान (उमेद) अंतर्गत प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना () अंतर्गत त्यांचा अपघात विमा काढलेला असल्याने त्यांच्या कुटुंबाला दोन लाख रुपयांचा विमा क्लेम मंजूर झाला आहे.

तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष, पंचायत समिती लोणार यांच्या मार्गदर्शनाखाली बचत गटातील महिलांचे पीएमएसबीवाय अंतर्गत विमा काढण्यात येतात. घटनेनंतर ग्राम सखी शिवकन्या राजू मुंढे यांनी संबंधित महिलेचा विमा असल्याची खात्री करून ही माहिती पती शंकर मुंढे यांना दिली. त्यानंतर आवश्यक सर्व कागदपत्रांची पूर्तता करून विमा क्लेम प्रक्रियेस सुरुवात करण्यात आली.

सर्व प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेंतर्गत दोन लाख रुपयांचा विमा क्लेम मंजूर करण्यात आला.

या प्रक्रियेसाठी बँकेचे शाखा व्यवस्थापक श्री. झलके, तालुका अभियान व्यवस्थापन कक्ष लोणार येथील तालुका व्यवस्थापक श्री. संदीप तिडके यांनी विशेष पाठपुरावा केला. तसेच प्रभाग समन्वयक योगेश रत्नपारखी, बँक सखी स्मिता बांगर व ग्राम सखी शिवकन्या




मुंढे यांनी मोलाचे सहकार्य केले. दि. २९ जानेवारी २०२६ रोजी हिर्डाव शाखेत आयोजित कार्यक्रमात लाभार्थी शंकर मुंढे व त्यांच्या मुलास विमा क्लेमचा धनादेश सुपूर्द करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी उमेद अभियान व प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजनेमुळे संकटग्रस्त कुटुंबाला मोठा आर्थिक आधार मिळाल्याबद्दल समाधान व्यक्त केले.


## शब्दकोडे क्र. 75

आडवे शब्द

१. सुबक, सुरेख ३. पुष्कळ ६. वेगवेगळे १०. नेमाने यात्रा करणारा १२. अंगावरील रोम १३. डोंगर, किल्ला १४. बडबड्या १६. दानशूर १८. नवलाची कामगिरी २०. आगटी २१. नंतर २२. तात्पर्य २३. बासुंदीला उगीच शह दे पाहणारे मिष्टान्न २४. ठीक, व्यवस्थित २५. सर्वत्र २९. कचरा ३१. खोड्या करण्याचा स्वभाव ३३. संत ज्ञानेश्वरांनी लिहिलेली प्रार्थना ३५. शंभर ३७. उसाचा सोललेला तुकडा ३९. अटीची भाषा ४१. चप्पल ४३. रसाळ ४७. अत्यंत मुलायम कापड ४८. घर ४९. संथपणे, सावकाशीने ५२. कमळ ५४. पुरुष ५५. पालिकेतील लोकप्रतिनिधी ५९. शेराचा चौथा भाग ६१. उलटीपूर्वीची स्थिती ६२. नासाडी, नाश ६३. टरफल ६४. गवताचे पान ६५. चेहरा ६७. होकाराच्या विरुद्ध ६८. हिंदीत मीठ ७०. गुंडाळी ७१. पुष्परस ७३. आश्चर्य ७५. धमनी ७६. मोल करता येणार नाही असे ७८. वंदन ८०. संरक्षण करणारा ८३. एक शेंगभाजी ८५. कर्णधार, संघनायक ८६. रागाने भराभर चालणे ८७. दारू ८८. वेदना ८९. गाणी

उभे शब्द

१. एखादे संकट आपोआप दूर होणे (वा.प्र.) २. कणीदार ३. हेलपाटा, यात्रेस जाणे ४. श्रीमंत ५. वारा, वायू ६. उदबत्ती ७. रेशमाची गुंडाळी ८. गुन्हा ९. तृण ११. अनामिकेच्या शेजारचे बोट १५. वर्तन, रीत १७. शूर १९. माठ २१. सुसर २२. शनिचा फेरा २५. सुकुमार २६. चषक २७. तर्क, ठोकताळा २८. शेवट ३०. प्रिय, श्रीविष्णु ३२. भीती ३४. मऊ ३५. लाज ३६. मिठी ३८. छोटेसे पौष्टिक फळ ४०. समशेर ४२. सोने ४४. अखेरीस ४५. रत्न ४६. इटलीची राजधानी ५०. उष्ण ५१. हे सर्व म्हणजे सर्वस्व ५२. चिखल ५३. अतिशय तीव्र ५६. वेगाने झिरपणारा माठ ५७. सैन्य ५८. वस्त्र, कापड ५९. सरसरीत ६०. दात ६३. छोटा लाकडी पूल ६४. पवित्र ६६. नटणारा मनुष्य ६९. हृदय काबीज करणे ७२. घटस्फोट ७४. छोटा, बारीक ७७. सत्ता ७९. चार आठवडे ८१. छिद्र, जखम ८२. मडके ८४. तेज, कांती



### शब्दकोडे क्र. 74 चे उत्तर

आडवे उत्तर

१.जास्वंद ३.कसब ५.सनसनाटी ९.पोळा १०.रमणी ११.डमडम १२.थकावट १४.गारवा १६.कसब १८.कनक २०.कानशील २२.रमजान २४.दडविणे २५.समर २७.रवानगी २९.मदार ३०.वहाण ३१.जयजवान ३३.तप ३५.सरगम ३६.नहर ३७.दलाल ४०.जनमन ४२.रजत ४३.सरबत ४४.महान ४५.पालक ४६.कारले ४९.हाट ५०.आवरण ५१.लव ५२.रजक ५३.माळवा ५५.उमा ५६.विघ्न ५७.रुपाया ५९.चरा ६१.माता ६२.बदक ६३.विना ६५.कनात ६६.लारा दत्ता ६८.तज ७०.तुलसीदास ७२.लवाजमा ७४.रसा ७५.रद ७६.मूल ७६अ.आटप ७७.अंत ७८.पुन्हा ७९.राणी ८०.थारा ८१.अलवारपणे

उभे उत्तर

१.जादूगार २.दरवाजा ३.कणीक ४.बडबडगीत ५.सडकणे ६.नमन ७.नाथ ८.टीकाकार ९.पोटशी १३.वन १५.रमणीय १७.सदन १९.कसदार २१.लक्ष्मण भरत शत्रुघ्न २३.नरवाहन २६.मरगळ २८.वानर २९.मसलत ३१.जयजयकार ३२.जनम ३४.पदर ३८.लाजलावणा ३९.खर ४१.चहाटळ ४३.सकल ४४.महामाया ४५.पाणउतारा ४७.रज ४८.लेकरु ५४.वाचनालय ५६.विकत ५८.पाणीदार ६०.रातवा ६१.मालामाल ६२.बत्तासा६३.वितुष्ट ६४.नाल ६७.दरसाल ६९.दडपणे ७१.सदरा ७३.जमूरा ७६अ.आर ७७.टप

## वृत्तविशेष...

### स्व. अजितदादा पवार यांचा पवित्र अस्थी कलश ३ फेब्रुवारी ला लोणार येथे

दैनिक आपला विदर्भ

■ देवानंद सानप

**बिबी** : महाराष्ट्र राज्याचे लाडके उपमुख्यमंत्री, लोकनेते स्व. अजितदादा पवार यांचा पवित्र अस्थी कलश मंगळवार दि. ३ फेब्रुवारी २०२६ रोजी सकाळी ठीक १०.३० वाजता लोणार शहरात येणार आहे. हा पवित्र अस्थी कलश शिवहारी कॉम्प्लेक्स, विनायक कापड केंद्रासमोर दर्शनासाठी ठेवण्यात येणार असून, यावेळी नागरिकांना अंतिम दर्शन घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे. स्व. अजितदादा पवार यांनी आपल्या कार्यकाळात जनतेसाठी घेतलेले निर्णय, विकासाभिमुख भूमिका आणि सामान्य माणसाशी असलेले नाते कायम स्मरणात राहील. त्यांच्या स्मृतींना आदरांजली अर्पण करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. या प्रसंगी सर्व पक्षीय लोकप्रतिनिधी, नेते, पदाधिकारी, कार्यकर्ते, पत्रकार तसेच नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून पवित्र अस्थी कलशाचे दर्शन घ्यावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ममताताईंनी सिंधुताई सपकाळ यांच्या कार्याला दिला उजाळा



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधीः** बुलढाणा शहरातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी एकत्र येऊन जिव्हाळा परिवाराची स्थापना केली आणि याच परिवाराच्या वतीने पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ यांच्या कन्या ममताताई सपकाळ यांचा ''तू आहेस ना'' हा मुक्त संवाद कार्यक्रम आयोजित करण्यात आला.

या कार्यक्रमाला बुलढाणेकर रसिक प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. बुलढाणा शहरातील गोवर्धन हॉल मध्ये हा कार्यक्रम उत्साहात पार पडला.

कार्यक्रमात ममताताईंनी सिंदुताई सपकाळ यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत त्याला उजाळा दिला, तसेच ताईंनी केलेले कार्य पुढे घेऊन जाण्याची जबाबदारी सर्वांवर असल्याचे मत व्यक्त केले.

याच कार्यक्रमादरम्यान गजलीच्या माध्यमातून ममताताईंनी बुलढाणेकरांची मने जिंकली. कार्यक्रमाला रसिक प्रेक्षकांचा मोठा प्रतिसाद पाहायला मिळाला.

### खामगावमध्ये जगद्गुरु संत तुकाराम महाराज जयंती उत्साहात साजरी

**बुलढाणा/प्रतिनिधी** : विठ्ठल भक्तीचा महिमा जगाला सांगणारे जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराज यांच्या जयंतीनिमित्त खामगाव शहरात विविध कार्यक्रमांचे भक्तिमय वातावरणात आयोजन करण्यात आले होते. 'जगद्गुरू संत तुकाराम महाराज जयंती उत्सव समिती'च्या वतीने काढण्यात आलेल्या भव्य शोभायात्रेमुळे अवघी रजत नगरी विठ्ठलमय झाली होती.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी संत तुकाराम महाराज सामाजिक सभागृह येथे झाली. राज्याचे कामगार मंत्री आकाश फुंडकर यांच्या हस्ते संत तुकाराम महाराजांच्या पुतळ्याचे पूजन व महाआरती करण्यात आली. यावेळी मान्यवरांची उपस्थिती आणि वारकऱ्यांचा उत्साह लक्षणीय होता.

आरतीनंतर येथून भव्य शोभायात्रेला प्रारंभ झाला. ही शोभायात्रा शहरातील प्रमुख मार्गांवरून मार्गक्रमण करत असताना ठिकठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. शोभायात्रेत सहभागी वारकऱ्यांनी टाळमृदंगाच्या गजरात 'ज्ञानबातुकाराम'चा जयघोष केला.विशेष आकर्षण म्हणून शहरातील प्रमुख चौकांमध्ये वारकऱ्यांनी फुगड्या खेळत व फेर धरून रिंगण घातले. यामुळे खामगावकरांना भक्तीचा एक अभूतपूर्व सोहळा पाहायला मिळाला.

### आठवड्याच्या पहिल्याच दिवशी सोनं- चांदीच्या दरात घसरण

**मुंबई/प्रतिनिधी :** रविवार १ फेब्रुवारी रोजी भारताचा अर्थसंकल्प जाहीर झाला. यावेळी सोने आणि चांदीबाबत कोणतीही मोठी थेट घोषणा करण्यात आली नसली तरीही; अर्थसंकल्पानंतर कमोडिटी बाजारात सोने आणि चांदीच्या किमतीत मोठी घसरण झाली आहे.

सोने आणि चांदीच्या किमतीत घसरण सुरूच:

आज, २ फेब्रुवारी रोजी सकाळी राजधानी दिल्लीत २४ कॅरेट सोन्याचा भाव प्रति १० ग्रॅम साठी १ लाख ६० हजार ७२० रुपयांवर आला. तर मुंबईत हा भाव प्रति १० ग्रॅम १ लाख ६० हजार ५७० रुपयांवर पोहोचला आहे. गेल्या तीन दिवसांपासून सोने आणि चांदीच्या किमतीत घसरण सुरूच आहे.सोन्याप्रमाणेच चांदीच्या घसरणीचा कलही कायम आहे. २ फेब्रुवारी रोजी सकाळी चांदीची किंमत प्रति किलोग्रॅम ३,४९,९०० रुपयांपर्यंत घसरली. एका आठवड्यात किंमत १५ हजार रुपयांनी वाढली आहे.

सोन्याचे दर :मुंबई, चेन्नई आणि कोलकात्यात सोन्याचे दर: सध्या मुंबई, चेन्नई आणि कोलकाता येथे २२ कॅरेट सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅम १,४७,१९० रुपये आहे, तर २४ कॅरेट सोन्याची किंमत प्रति १० ग्रॅमसाठी १,६०,५७० रुपये इतका आहे.

# बुलढाण्यात धक्कादायक घटना; ५ वर्षीय चिमुरडीवर अत्याचार

दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधीः** बुलढाणा तालुक्यातील हतेडी शिवारात सुरू असलेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या बांधकामस्थळी एका परप्रांतीय मजुराने पाच वर्षीय अल्पवयीन मुलीवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे.

घटनेनंतर आरोपीने मुलीचे अपहरण करून तिला मलकापूर रेल्वे स्थानकात नेले. मात्र बुलढाणा ग्रामीण पोलिसांनी तातडीची कारवाई करत पीडित मुलीला सुखरूप ताब्यात घेत आरोपीला अटक केली आहे.

या प्रकल्पाचे कंत्राट 'सॅम इंडिया' या कंपनीकडे असून, येथे मोठ्या प्रमाणावर परप्रांतीय मजूर कार्यरत आहेत. २८ जानेवारी रोजी दुपारी परिसरात एकटी असलेल्या मुलीला झारखंड राज्यातील पलामू येथील २५ वर्षीय आरोपी संतोष ब्रिजपाल भोईया याने फूस लावून जवळील झोपडीत नेले आणि तिच्यावर लैंगिक अत्याचार केला. या घटनेत मुलीला गंभीर दुखापत झाली असून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला.

घटनेनंतर आरोपीने तिला उपचारासाठी रुग्णालयात न नेता थेट मलकापूर रेल्वे स्थानक गाठले. दरम्यान, संध्याकाळी मुलगी बेपत्ता असल्याची तक्रार मिळताच बुलढाणा ग्रामीण पोलिसांनी जिल्हाभर सतर्कता अलर्ट जारी केला. बसस्थानके आणि रेल्वे स्थानकांवर शोधमोहीम राबविण्यात आली. अखेर रात्री मलकापूर रेल्वे स्थानकात आरोपीसह पीडित मुलीला ताब्यात घेण्यात आले.

पीडित मुलीवर सुरुवातीला स्थानिक रुग्णालयात उपचार करण्यात आले. मात्र रक्तस्राव न थांबल्याने पुढील उपचारासाठी तिला अकोला येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात दाखल करण्यात आले असून तिच्यावर उपचार सुरू आहेत.

या प्रकरणी पीडितेच्या पालकांच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील तपास बुलढाणा ग्रामीण पोलीस करीत आहेत.



## चौकशीत दोषी आढळून देखील ग्राम सचिव व सरपंच यांच्यावर कारवाई नाही



दैनिक आपला विदर्भ

**बुलढाणा/प्रतिनिधी** : बुलढाणा गट विकास अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी आलेल्या ग्रामस्थांना पाहून गट विकास अधिकारी अमिता अजित पवार यांचं कार्यालय सोडून पलायन केले असून ग्रामस्थांचा गेल्या आठ तासांपासुन गटविकास अधिकाऱ्यांच्या दालनात अध्यापही ठिय्या सुरु आहे. जोपर्यंत करवाई नाही ठिय्या सुरूच राहणार, ग्रामस्थांची भूमिका घेतली आहे.

बुलढाणा तालुक्यातील देऊळघाट ग्रामपंचायतीत १५ व्या वित्त आयोगातील निधी रजेवर असतानाही ग्रामसचिव व सरपंच यांनी संगणमताने अवैधरित्या रकमा काढून खर्च केला...याविषयीं ग्रामस्थांनी तक्रार केल्यानंतर चौकशी अंती जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी ग्रामसचिव व सरपंचावर कारवाई करण्याचे लेखी आदेश गट विकास अधिकाऱ्यांना दिले. मात्र दोन वर्ष होऊनही गटविकास अधिकारी अमिता अजित पवार यांनी सरपंच व सचिवावर कारवाई न केल्याने संतप्त गावकऱ्यांनी आज गट विकास अधिकाऱ्यांना जाब विचारण्यासाठी सकाळी ११ वाजता कार्यालय गाठल मात्र ग्रामस्थांना बघून गटविकास अधिकाऱ्यांनी कार्यालयातून पलायन केलं व अद्यापही कार्यालयात न आल्याने गेल्या आठ तासांपासून ग्रामस्थ गट विकास अधिकाऱ्यांच्या दालनात ठिय्या देऊन आहे. जो पर्यंत गट विकास अधिकारी कार्यालयात येत नाही तोपर्यंत ठिय्या सुरूच राहील अशी भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

## चिखलीत दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांना सर्वपक्षीय श्रद्धांजली

**चिखली/प्रतिनिधी** : राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या निधनाबद्दल संपूर्ण राज्यभरातून शोक व्यक्त करण्यात येत असून, विविध माध्यमांतून त्यांना श्रद्धांजली वाहण्यात येत आहे. चिखली शहरात आज सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन करण्यात आले होते. या शोकसभेत सर्वच पक्षांच्या मान्यवरांनी स्वर्गीय अजित दादा यांच्या आठवणींना उजाळा देत त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.



या शोकसभेत आमदार श्वेता महाले यांच्यासह सर्वपक्षीय नगरसेवक, पदाधिकारी आणि कार्यकर्ते तसेच शहरवासी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. यावेळी उपस्थित सर्व मान्यवरांनी स्वर्गीय अजित दादांच्या आठवणींना उजाळा दिला.

## जनगणनेच्या सूचीत ओबीसींचा स्पष्ट उल्लेख नाही; राजपत्र दुरुस्तीची मागणी

दैनिक आपला विदर्भ



**चंद्रपूर/प्रतिनिधी** : : जातनिहाय जनगणना करण्यासाठी आज, २ फेब्रुवारी २०२६ रोजी, राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयात अप्पर जिल्हाधिकारी नितीन व्यवहारे यांना निवेदन देण्यात आले.

केंद्र सरकारने अनुसूचित जाती, अनुसूचित जमातींसह ओबीसी समाजाचीही जातनिहाय जनगणना करण्याची घोषणा केली आहे. या संदर्भात २२ जानेवारी रोजी केंद्र सरकारने राजपत्र प्रसिद्ध करत जनगणनेसाठी ३३ प्रश्नांची सूची जाहीर केली आहे.

या सूचीत बाराव्या क्रमांकावर अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातींचा स्पष्ट उल्लेख करण्यात आला आहे. मात्र ओबीसी समाजासाठी 'इतर' असा शब्द वापरण्यात आल्याने मोठा संभ्रम निर्माण झाला आहे.

ओबीसी समाजाचा स्पष्ट उल्लेख टाळण्यात आल्याचा आरोप राष्ट्रीय ओबीसी महासंघाने केला असून, केंद्र सरकारने ओबीसी समाजाशी दगाबाजी केल्याचा आरोपही यावेळी करण्यात आला.

सदर राजपत्रात तात्काळ दुरुस्ती करून ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम असलेले नवीन राजपत्र जाहीर करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. ही मागणी मान्य न झाल्यास येत्या मार्च महिन्यात दिल्लीतील जंतर-मंतर येथे आंदोलन करण्यात येईल, अशी माहिती ओबीसी महासंघाचे महासचिव सचिन राजुरकर यांनी दिली.

## पत्रकार सादीक कुरेशी संजीवनी दर्पण पुरस्काराने सन्मानित

**संजीवनी परिवाराचा २७ वा वर्धापन दिन उत्साहात साजरा**



दैनिक आपला विदर्भ

**मेहकर/प्रतिनिधी** :सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या डोणगांव येथील संजीवनी सेवाभावी परिवाराच्या वतीने २७ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात दैनिक मातृछायाचे संपादक सादीक कुरेशी यांना संजीवनी दर्पण पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

दि १ फेब्रुवारी रोजी राजुरकर मंगल कार्यालयात आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बुलढाणा जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे जिल्हाध्यक्ष प्रमोदबाप्पु देशमुख तर प्रमुख अतिथी म्हणून तहसीलदार प्रतिक्षा तेजनकर, सहा पोलीस निरीक्षक संतोष आघाव, भारत मोरे, ठाणेदार अमरनाथ नागरे, अनिल आवटी, अकबर पठाण, डॉ गजानन उल्हामाले, राजेंद्र पळसकर , डॉ नकुल फुले, मेहकर पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्ता उमाळे आदि मान्यवर मंडळी उपस्थित होती, स्व डॉ जगदीश बिडवई यांच्या स्मृति प्रित्यर्थ दरवर्षी प्रमाणे यावर्षी सुध्दा पत्रकार बांधवांना प्रेरणा मिळावी हा मुख्य उद्देश ठेवून पत्रकार बांधवांना संजीवनी दर्पण पुरस्काराने गौरविण्यात येते. या वर्षी पत्रकार दैनिक मातृछाया चे संपादक सादिक कुरेशी, गजानन देशमुख, रविंद्र वाघ,नवल राठोड,अशोकराव वानखेडे यांना पुरस्काराने सन्मानित केले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन हमीद मुल्लाजी तर आभार प्रदर्शन सुरेन्द्र सिंह चव्हाण यांनी केले.

पुरस्कार प्राप्त सर्व पत्रकार बांधवाचे जिल्हा ग्रामीण पत्रकार संघाचे अध्यक्ष प्रमोद बाप्पु देशमुख, तालुका ध्यक्ष गजानन चनेवार, दत्ता उमाळे,कैलास राऊत, रफीक कुरेशी, विष्णू आखरे, गणेश पळसकर, अबरार खान मिल्ली, गजानन नरवाडे अभिनंदन केले आहे.मेहकर तालुक्यात सन्मानाचा पुरस्कार मिळाल्याबद्दल मित्र परिवाराच्या वतीने सादीक कुरेशी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## स्व. काशिनाथ महादजी वानखेडे यांच्या १४ व्या पुण्यस्मरणानिमित्त

# बेलगाव येथे रक्तदान शिबिराचे आयोजन







दैनिक आपला विदर्भ

■ गजानन जाधव

**बेलगाव** : स्व. काशिनाथ महादजी वानखेडे यांच्या १४व्या पुण्यस्मरणानिमित्त आज सोमवार, दिनांक २ फेब्रुवारी २०२६ रोजी बेलगाव येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते.

या रक्तदान शिबिराचे आयोजन सुरेशराव वानखेडे, सुधीरभाऊ वानखेडे, सतिषभाऊ वानखेडे तसेच संदीपराव वानखेडे यांच्या वतीने करण्यात आले. शिबिरासाठी माजलगाव रक्तदान केंद्र, माजलगाव यांच्या पथकाचे डॉ. मोहन गायकवाड, डॉ. संदेश राठोड, डॉ. संदीप राठोड, तंत्रज्ञ डॉ. प्रिती गायकवाड व डॉ. संजय बोरकर यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तसंकलन करण्यात आले.

कार्यक्रमाची सुरुवात गावातील प्रतिष्ठित नागरिक ज्ञानेश्वर माऊली वानखेडे यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन करून करण्यात आली.

यावेळी गावातील प्रतिष्ठित नागरिक विजयभाऊ जाधव, सुभाष पुजांजी वानखेडे, दीनकरराव बाजड, हारुण शेख सत्तार, बालाजी वानखेडे, अफसरखा निबांजी वानखेडे, गोपालभाऊ वानखेडे, लक्ष्मणराव नवघरे, सितारामजी मिस्त्री, रावबाभाऊ मैंद, ओंकारभाऊ, मनिषभाऊ वानखेडे यांच्यासह गावातील बहुसंख्य नागरिक उपस्थित होते.

यावेळी डॉ. संदेश राठोड यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करत रक्तदानाचे महत्त्व व त्याचे फायदे सांगितले. रक्तदानामुळे गरजू रुग्णांचे प्राण वाचतात व हे एक महान पुण्यकर्म असल्याचे त्यांनी सांगितले. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विनोद मेटांगळे सर यांनी केले तर आभार प्रदर्शन मुख्याध्यापक दीपक कुटे सर यांनी मानले.